# सकारात्मक उर्जा चळवळ वेध

– देवेंद्र ताम्हणे

आणि... तपपूर्ती चिन्हांचे विजेते आहेत, चिंतन क्लासेस, कल्याण.

१२ व्या वेधच्या शेवटच्या सत्राची सुरुवात या वाक्याने झाली. जोरदार टाळ्यांच्या गजरात व्यासपीठावर जाताना मन आनंदाने ओथंबुन गेले होते. हे यश होते विद्यार्थी, सहकारी शिक्षक, पालक या सगळ्यांनीच हा क्षण नक्कीच मनात साठवून ठेवला आहे. आजही अनेक अडचणींच्या क्षणी ते सन्मान चिन्ह मला सन्मानाने विचार करण्याची प्रेरणा देते.

"Vocational Education Direction and Harmony" म्हणजेच Vedh हा व्यक्तिमत्त्व विकासासाठीचा एक छोटासा भाग आहे. सर्वात प्रथम 'वेध' बद्दलची माहिती वर्तमानपत्रात वाचली आणि त्यांनी मांडलेली कार्यक्रमाची संकल्पना खूपच आवडली. डिसेंबर २००० मध्ये प्रथम मी, माझ्या सहकारी शिक्षिका सौ. लिमये मॅडम व माझी आई असे तिघेच कार्यक्रमाला हजर राहिलो. कार्यक्रमाचे स्वरूप, कार्यक्रमाला आलेली विविध व्यक्तिमत्त्व आणि डॉ. आनंद नाडकर्णींनी त्यांच्याशी साधलेला संवाद हे सर्व पाहून आम्ही इतके भारावून गेलो होतो की त्याच क्षणी मनाशी पक्के ठरवून टाकले की या कार्यक्रमाचा आनंद आपल्यापुरता मर्यादित न ठेवता तो जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवायचा. आणि २००१ पासून चिंतन क्लासेसचे विद्यार्थी, शिक्षक आणि उत्साही पालक मोठ्या संख्येने ठाण्याला कार्यक्रमात सहभागी व्हायला लागले. आणि आजही अनेक आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक आणि अनेक पालक सातत्याने १३ वर्ष या वेधला हजेरी लावतात.

पाठ्यपुस्तकातील धडे शिकणारी मुले ज्यांचे जीवनचरित्र म्हणजेच एक धडा असतो, अशा व्यक्तिंना जेव्हा समोर बघतात, ऐकतात तेव्हा त्यांना मिळणारा आनंद, ज्ञान, प्रेरणा सर्वच अवर्णनीय असते. वेधच्या प्रवासात अशी कित्येक व्यक्तिमत्त्व भेटतात की ज्यांच्या एकदीड तासांच्या चर्चेतून आयुष्यभराची पुंजी जगायला उपयुक्त ठरते. 'वेध' बद्दल जेव्हा व्यक्तिश: मी विचार करतो तेव्हा एक शिक्षक, पालक, व शेवटी एक माणूस म्हणून निश्चितच प्रत्येक वर्षी आपले अनुभवविश्व समृद्ध होत आहे, विचारांना योग्य दिशा मिळते, प्रगल्भता वाढत आहे. आणि सतत विद्यार्थ्यांबरोबर आपणही घडत आहोत हे जाणवतं. 'वेध'ने आजपर्यंत आम्हाला काय दिलं हे अगदी थोडक्यात सांगायच तर अनेक अशा व्यक्तिंचा वैचारिक सहवास 'वेध'नी आम्हाला दिला, ज्यांची वैचारिक, बौद्धिक प्रगल्भता थक्क करणारी आहे, सामाजिक जाणीव व समाजाला त्यांचं देण नतमस्तक करणारं आहे, हा गाव, हा देश नव्हे तर अवघ विश्वच जगण्यासाठी सुंदर व्हावं यासाठी अनेकांची चाललेली धडपड निश्चित एक आश्वासक विश्वास निर्माण करणारी ठरते व प्रत्येक वर्षी जीवनाकडे बघण्याचा आमचा दृष्टीकोन थोडासा प्रगल्भ, बराचसा व्यापक आणि खूपच सकारात्मक बनवणारा, पुढील वर्षभर चांगल काम करण्याची प्रचंड उर्जा प्रत्येक 'वेध'मधून बाहेर पडतांना आमच्या गाठीशी असते.

विद्यार्थी-पालक-शिक्षक व इतर अनेक व्यावसायिक क्षेत्रात वावरतांना किंवा नव्याने प्रवेश करतांना आवश्यक असलेला एक खोल व्यापक दृष्टीकोन निर्माण करून त्यांचा एक निश्चित वैचारिक दृष्टीकोन देणारी, समाजातील लोप पावत चाललेली मानवी मूल्ये टिकवण्याची व जोपासण्याची म्हणजेच "value system"बांधणारी व पुढच्या पिढीसमोर असे आदर्श ठेवणारी की ज्यामुळे त्यांना पुढील आयुष्य जगतांना प्रचंड उर्जा, प्रोत्साहन व सकारात्मकता मिळेल अशी चळवळ असे आजच्या 'वेध'चे स्वरूप झाले आहे.

वेधच्या निमित्ताने अनेक माजी विद्यार्थी, पालक हे सुद्धा सतत क्लासच्या संपर्कात येतात. दरवर्षी ऑक्टोबरपासूनच वेधबद्दल त्यांची विचारणा चालू होते. प्रत्येक वर्षी वेधमध्ये

सहभागी होताना काहीतरी वेगळे करावे असे विद्यार्थी, शिक्षक व संचालक यांचे मत असते. यातूनच सायकल वारी, ज्ञान दिंडी, पायीवारी आणि स्वामी विवेकानंदाच्या १५० व्या जयंती निमित्त प्रदर्शन असे विविध उपक्रम राबवले.

एखादी घटना event कशी करावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे सायकल वारी! २०व्या वेधचे सूत्र होते 'सावध साहस' म्हणूनच आपण सायकलने कल्याण ते ठाणे प्रवास करावा असे विद्यार्थ्यांच्या मनात आले. ही भावना मी डॉ. नाडकर्णीसमोर मांडली आणि मग काय त्यांच्या मार्गदर्शनातून एक event उभे राहिले. वारीतील प्रत्येक विद्यार्थ्याला T-Shirts, कल्याणला झेंडा दाखवायला मा.आमदार गणपतशेट गायकवाड यांची उपस्थिती, पूर्ण रस्ता वेधची जोशयुक्त गाणी, प्रत्येकाच्या सायकलला वेधचे झेंडे आणि ३-४ तासांचा हसत खेळत प्रवास, जवळ जवळ ६० विद्यार्थी आणि मी स्वत: हा प्रवास खरच जबरदस्त enjoy केला. हे एक साहसच होते. कारण अतिशय गर्दीचा कल्याण-ठाणे महामार्ग, महामार्गावर पहिल्यांदाच सायकल चालवणारी मुले-मुली, उत्साही पालक, शिक्षक यांचे मार्गदर्शन, रस्त्यात घडणाऱ्या अनपेक्षित घटना आणि बरेच काही. पण आम्ही 'सावध'ही होतो. बरोबर एक ॲब्युलन्स, एखादा विद्यार्थी दमल्यास replace करणारे विद्यार्थी, सायकल खराब झाल्यास ती ठेवण्याची सोय, अर्ध्यारस्त्यात नाष्टा व पाण्याची योग्य सोय, पूर्णवेळ बरोबर Traffic police, कार्यक्रमाचे पूर्ण वेळ Vedio shooting आणि ठाण्याला पोहचल्यावर डॉ. नाडकर्णी व कर्नल सुनिल देशपांडे यांनी केलेले दमदार स्वागत! एक जबरदस्त 'सावध साहस' केल्याचे समाधान व आनंद आम्हा सर्वाच्याच चेहेऱ्यावर दिसत होते. खरच आम्हा सर्वांसाठी तो एक अविस्मरणीय दिवस आहे. वेध परिषद सुरू होताना डॉक्टरांनी व्यासपीठावर बोलवले तेव्हा तर खूपच आनंद झाला. वेधच्या व्यासपीठावर जाण्याची माझी दुसरी वेळ. कर्तृत्वाला सलाम करणाऱ्या वेधच्या व्यासपीठावर असताना सहजच मनात गाण्याचे शब्द उमटले...

'थकल्यावरही ध्येय उरीचे रोज असावे जागे, पहाट होता नव्या दमाने मन मार्गाला लागे...'

चार वर्षांपूर्वी वेधच्या मिटिंगला गेलो असता डॉक्टर म्हणाले सर आपल्याला तुमच्या क्लासमधील विद्यार्थ्यांचा गाण्याचा Choir बनवायचा आहे. तेव्हा मला नक्की काही समजले नाही पण आलेली संधी दवडायची नाही या हेतूने मी त्यांना लगेच होकार दिला. तशी आमची मुले काही गाणारी नाहीत अथवा गाण शिकतही नाहीत. पण बेसुरांचा सूर आणि बेतालांचा ताल शोधण्याचे कसब असलेल्या सौ. स्मिताताई माझ्या परिचयाच्या आहेत. त्यांच्या समोर हा प्रस्ताव मांडला आणि आमच्या गाण्याच्या rehearsals सुरू झाल्या. योग्य वेळेस सौ. अनघाताई वझे व सौ. मंजुश्रीताई पाटील यांनीही खूप मेहनत घेऊन मार्गदर्शन केले आणि मग काय हसत खेळत धमाल करीत आमचा choir वेधच्या व्यासपीठाचे एक अंगच बनला. गाण न शिकलेल्या मुलांच्या मागून ३००० लोक गात आहेत हे पाहून एक नवा आत्मविश्वास मुलांच्या मनात निर्माण झाला तो सततच्या सरावाने. आणि मनात शब्द उमटले...

''मी रोज स्वत:शी गावे, श्वासात मिसळूनि घ्यावे, हे सुरू नव्या हिमतीचे...''

''घागर ते सागर'' अर्थात Dream to Team हे पुढील वर्षीचे वेधचे सूत्र होते आणि तेव्हा लक्षात आले हे सर्व शक्य झाले ते आमच्या टीममुळेच. पडेल ते काम करणाऱ्या सौ. लिमये मॅडम, कमी तिथे आम्ही म्हणणाऱ्या सौ. मेहेर मॅडम व सौ. भोर मॅडम आणि सर्व कामात मदत करणारा चिंतन क्लासेसचा ऑफिस स्टाफ व इतर सहकारी शिक्षकवृंद हा team चा एक भाग तर आमच्यासाठी सदैव सहकार्य करणारा पालकांचा गट हा दुसरा भाग. जसे श्री. मोहन केळकर श्री. व सौ. कारखानिस श्री. जाधव यांची मदत अवर्णनीय असते. हे सर्व लिहिताना सहज मनात वेधचे गाणे आले...

''टप टप थेंबे भरते घागर, लाटांनी या सजतो सागर...''

यावर्षीच्या वेध कार्यक्रमाचे सूत्र होते ''जगण्याचा ताल व जगण्याचा तोल'' रविवारच्या सत्रात बीड जिल्ह्यातील पाटसरा गावातील ऊसतोडणी कामगाराचा मुलगा श्री.संतोष

गर्जे(वय २७ वर्षे) या व्यक्तीचे विचार ऐकायला मिळाले. घरातील सर्वजण अशिक्षित, संतोष लहानपणी खूप मस्ती करत असे म्हणून त्याच्या आजोबांनी त्याला शाळेत घातले. आई वडील सहा महिने कामानिमित्त घराबाहेर म्हणून मोठ्या बहिणीने सांभाळ केला. अतिशय खडतर व गरीब परिस्थितीत राहून जेमतेम १२वी पर्यंत शिक्षणपूर्ण केले. बहिणीच्या मृत्यूनंतर वडील घर सोडून गेले अशा परिस्थितीत एकाकी पडलेल्या अनाथ संतोषला खूप दु:ख झाले व आपल्यासारख्या अनाथ मुलांसाठी काहीतरी करावे या कल्पनेने त्याने त्याच्या मित्राच्या मदतीने गेवराई गावात 'आई' हे अनाथालय सुरू केले. हे कार्य करत असताना त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. ९ वर्ष भिकाऱ्या सारखे जीवन जगावे लागले पण अनाथ मुलांना त्यांचे हरवलेले बालपण देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संघर्षाची कहाणी ऐकताना अंगावर काटा येत होता. मन भरून येत होते. अशा व्यक्तीला आर्थिक पाठबळ व मदतीचा, मायेचा हात हवा असतो. वेध परिषदेत जमलेल्या आमच्या विद्यार्थ्यांना याची जाणीव झाली आणि त्यांनी प्रत्येकाला जमेल तसे त्यांच्याजवळचे खाऊचे पैसे गोळा केले व ८११ रु. जमा करून संतोष गर्जे यांना दिले. विद्यार्थ्यांच्या या कृतीचे आम्हा सर्वांना विलक्षण कौतक वाटले आणि आनंद ही झाला. न सांगता न मागता त्यानी जाणीव पूर्वक केलेली मदत खूप मोठी व मोलाची आहे. ही घटना बघता, स्वत:जवळ काय आहे आणि इतरांसाठी त्यातून काय करावे हे मुलांना समजले. समाजाला एकमेकांशी जोडणे व सहसंवेदनाची जाणीव मुलांमध्ये निर्माण होणे ही 'वेध'ला जाण्याची दोन्ही उद्दिष्ट्ये साध्य होत आहेत असे लक्षात आले. वेधला नेण्यामागचा आमचा उद्देश सफल झाल्याचा आनंद आम्हा सर्वांना झाला.

प्रत्येक वेळेस नवीन वर्षाची सुरुवात होते तेव्हा आपण सर्वजण येणारे वर्ष नवीन काय घेऊन येईल या उत्सुकतेत असतो. इ.स. २०१४ चे स्वागतही आम्ही याच उत्सुकतेने आणि आशावादाने केले आणि पहिल्याच महिन्यात एक सुखद धक्का बसला. तो सुखद धक्का असा की तन, मन व अल्पस्वल्प प्रमाणात धनाने आम्ही ज्या 'वेध'शी गेली अनेक वर्ष जोडलो गेलोय त्या वेधच्या विचारमंथन करणाऱ्या झंझावाताने आमच्या सारख्या इतर अनेक कल्याणवासीयांना ही झपाटून टाकावे व त्याचसाठी कल्याणमध्ये 'वेध'चे आयोजन व्हावे या आमच्या इच्छेला नाडकर्णी सरांनी ग्रीन सिग्नल दिला.

वेधच्या माध्यमातून आजच्या तरुणांपुढे विविध आदर्श ठेवणे व त्या आदर्शांना बोलते करण्याचे मोठे कार्य डॉ. आनंद नाडकर्णी आणि त्याची टीम मोठ्या आनंदाने व उत्साहाने करत आहेत. वेधची चळवळ आज ८ शहरात सातत्याने चालू आहे. वेधच्या नकाशावरचे कल्याण हे नववे शहर! तेव्हा जास्तीत जास्त लोकांनी या चळवळीत सहभागी होऊ या व आचार, विचार आणि कृतीने समृद्ध होऊ या.

– देवेंद्र ताम्हणे
समन्वयक, कल्याण वेध
मो.: ९१६७११८३८५

## आय. पी. एच. चे उपक्रम

**मनतरंग – आय्.पी.एच्. च्या माध्यमविभागातर्फे आयोजित होणारा हा 'मनआरोग्य चित्रपट महोत्सव.' द्वैवार्षिक स्वरुपामध्ये होणाऱ्या ह्या महोत्सवाबरोबरच दर सहा आठवड्याला संस्थेच्या परिसरामध्ये मनतरंग फिल्मक्लबचे आयोजनही करण्यात येते.**